॥ कोटि कोटि रूपें तुझीं ॥

गायकः सुरेश वाडकर
गीतः यशवंत देव
संगीतः प्रभाकर जोग

कोटि कोटि रूपें तुझीं, कोटि सूर्य चंद्र तारे
कुठें कुठें शोधूं तुला, तुझे अनंत देव्हारे ॥ धृ. ॥

बीज अंकुरे ज्या ठायीं, तिथें तुझा वास
तुझा स्पर्श आणुन देतो, फुलाला सुवास
चराचरा रंगवीसी, रंग तुझा कोणता रे? ॥ १ ॥

कधीं दाह ग्रीष्माचा तूं, कधीं मेघ ओला
जनीं निर्जनींही तुझा, पाय रोवलेला
तुझी खूण नाहीं ऐसा गांव तरी कोणता रे? ॥ २ ॥

खरें रूप देवा तुझें, कोणतें कळेना
विटेवरी तूंच, तूंच वैकुंठींचा राणा
तुला आळवाया घ्यावा शब्द तरी कोणता रे? ॥ ३ ॥